चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०२ फेब्रुवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ०१/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, माजरी, ब्रम्हपुरी, नागभिड, तळोधी, चिमुर, मुल, पाथरी, पोंभुर्णा, राजुरा, धाबा, कोरपना, सिंदेवाही** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१५** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ०५ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **१,००,६००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

———————————————————————————————————————————

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**१)पोलीस स्टेशन रामनगर :—**

दिनांक **०१/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **रामनगर** अंतर्गत शेन्डे ले आउट येथे ०२ आरोपी ईसम हे सटट्ापटट्ीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **रामनगर** येथे अप. क्र. **१२७/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०२ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१४,८००/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **रामनगर** पोलीस करीत आहे.

———————————————————————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# ब्रम्हपुरी पोलीसांनी अवघ्या २४ तासात घरफोडीच्या गुन्हयातील आरोपीस केले जेरबंद, ४ लाख ५७ हजार रुपये हस्तगत

दि. ३१/०१/२०१९ रोजी अजय परमेश्वर गायकवाड रा. परडा जि.वर्धा ह.मु. आरमोरी रोड ब्रम्हपुरी यांनी ब्रम्हपुरी पोस्टेला येवुन तक्रार दिली की, मौजा बेलदाटी चांदगांव रोड येथे वैभव लक्ष्मी नगरी येथे प्लॉट विक्री चालू असल्याने प्लॉट बुकींगची रक्कम आल्यानंतर किरायाने राहत असलेल्या घरातील कपाटात ठेवण्यात येत होती. अजय गायकवाड यांनी दिनांक ३१/०१/२०१९ रोजी सुध्दा ४ लाख ६० हजार कपाटात ठेवुन कामाचे ठिकाणी साईटवर निघुन गेले. दुपारी २ वाजता कामावरुन परत घरी परत आल्यानंतर घराच्या दरवाजाचे लॉक व कपाटाचे लॉक तोडलेले त्यांना दिसले व कपाटातील ४ लाख ६० हजार रुपये चोरीस गेल्याचे दिसले. तक्रारदार यांनी दिलेल्या रिपोर्टवरुन पोस्टे ब्रम्हपुरी येथे अपराध क्रं.८७/२०१९ कलम ४५४,४५७,३८० भादंवि प्रमाणे अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच ब्रम्हपुरी पोलीसांनी तात्काळ घटनास्थळ गाठीत तपासचक्रे फिरवुन माहीती काढण्यास सुरवात केली. पोलीसांनी योग्य रीतीने तपासकरीत संशयाची सुई जात असलेल्या व घटना घडल्यानंतर घरुन फरार असलेला शरद तुळशिराम अडकणे (प्लॉट एजन्ट) रा. समतानगर वर्धा ह.मु. शेषनगर, ब्रम्हपुरी याचा शोध घेवुन त्यास रात्रींच ब्रम्हपुरी रेल्वे स्टेशन परीसरातुन ताब्यात घेतले. त्यास विचारपुस करुन अधिक तपास केला असता त्याने गुन्हयाची कबुली देवुन चोरलेली रक्कम ४ लाख ५७,६०० हजार रुपये त्याने सध्या राहत असलेल्या घरातुन पोलीसांना काढुन दिले असुन पुढिल तपास ब्रम्हपुरी पोलीस करीत असुन आरोपीचा पोलीस कस्टडी रिमांड मिळाला आहे.

सदरची कार्यवाही श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांच्या मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक, श्री. मकेश्वर, पोस्टे ब्रम्हपुरी यांचे नेतृत्वात, पोउपनि. प्रमोद कुरसंगे यांचे सह पोहवा. प्रशांत शेंदरे, पेठकर, पोस्टे ब्रम्हपुरी यांनी गुन्हा उघडकीस आण्याकरीता महत्वाची कामगीरी बजावली आहे.

पोलीसांकडुन जनतेला आवाहन करण्यात येते की, कोणत्याही अनोळखी व्यक्तीला घर किरायाने (भाडे तत्वावर) देतांना त्या व्यक्तीची संपुर्ण माहिती घेणे आवश्यक आहे. ज्यामध्ये त्याचे आधार कार्ड, मोबाईल नंबर, ती व्यक्ती कोठे काम करते, त्याचे मुळ गाव कोणते आहे. इत्यादी बाबत सविस्तर माहिती घर मालक यांचेजवळ असणे आवश्यक असुन या माहितीची खात्री करून त्याबाबत पोलीसांना सुध्दा माहिती देणे अत्यंत आवश्यक आहे. जेनेकरून एखादी घटना घडल्यास त्या व्यक्तीचा शोध घेण्यास किंवा तपास करण्यास मदत होईल. तसेच जास्तप्रमाणात रोख रक्कम किंवा दागीने घरात न ठेवता सुरक्षितरित्या लॉकर्स मध्ये सुरक्षित ठेवावे.

बॅकेमधुन कॅश काढतांना आपल्यावर कोणी अनोळखी व्यक्ती पाळत ठेवत आहे काय या बाबत काळजी घ्यावी. तसेच बाहेरगावी जातांना आपल्या शेजाऱ्यांना सांगुण जावे. याप्रमाणे दक्षता घेणे काळजी घेणे आवश्यक आहे.